RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक ५] बुधवार, जानेवारी २०, २०२१/पौष ३०, शके १९४२ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

गोकुळ तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, १० वा मजला, मंत्रालय,
मुंबई ४०० ००१, दिनांक १८ जानेवारी २०२१.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेप्रनि-२०१२/प्र.क्र.१६७/सेवा-२.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा आयुक्तालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील " जिल्हा शल्य चिकित्सक, गट-अ संवर्ग किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी, गट-अ संवर्ग " या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्यचिकित्सक, गट-अ संवर्ग व जिल्हा आरोग्य अधिकारी, गट-अ संवर्ग (सेवाप्रवेश) नियम, २०२१ असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) " **जिल्हा शल्यचिकित्सक संवर्ग** " याचा अर्थ, जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील, सहायक संचालक (वैद्यकीय) किंवा सहायक संचालक, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक (चिकित्सालयीन), वैद्यकीय अधिकारी (भिषक), वैद्यकीय अधिकारी (शल्यचिकित्सक), वैद्यकीय अधीक्षक किंवा अधीक्षक, उप जिल्हा रुग्णालय किंवा ग्रामीण रुग्णालय किंवा स्त्री रुग्णालय किंवा अन्य रुग्णालये किंवा अस्थिव्यंगोपचार रुग्णालय किंवा विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय किंवा सर्वोपचार रुग्णालये, वैद्यकीय अधिकारी (रुग्णालयीन प्रशिक्षण केंद्र) किंवा विशेष कार्य अधिकारी, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, असा आहे;

(ब) " **जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग** " याचा अर्थ, जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील सहायक संचालक (कुटुंब कल्याण किंवा माता आरोग्य किंवा बाल आरोग्य किंवा हिवताप किंवा कुष्ठरोग किंवा कुष्ठरोग प्रशिक्षण केंद्र किंवा क्षयरोग किंवा प्रौढ प्रजनन व लैंगिक आरोग्य किंवा हत्तीरोग), प्राचार्य किंवा साथरोगशास्त्रज्ञ किंवा वैद्यकीय व्याख्याता-नि-प्रयोग निर्देशक, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, वरिष्ठ व्याख्याता किंवा प्राध्यापक, सार्वजनिक आरोग्य संस्था, वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी (पोषणआहार), अतिरिक्त किंवा सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्य संपर्क), जिल्हा क्षयरोग अधिकारी, असा आहे;

(क) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे;

(ड) " पदवी " याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे;

(ई) " आयुक्तालय " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचे आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई, असा आहे;

(फ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ग) " भारतीय वैद्यक परिषद " याचा अर्थ, भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ अन्वये घटित केलेली भारतीय वैद्यक परिषद, असा आहे;

(ह) " सांविधिक विद्यापीठ " याचा अर्थ, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार स्थापन केलेल विद्यापीठ, असा आहे.

३. **" जिल्हा शल्यचिकित्सक "** गट-अ संवर्गातील पदावरील नियुक्ती एकतरः—

(अ) (एक) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी, गट-अ या पदावर काम करीत असलेल्या आणि नामनिर्देशनाने नियुक्ती होण्यासाठी या नियमाच्या उप-नियम (ब) च्या खंड (तीन) मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या त्या पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा केलेल्या व्यक्तींमधून ज्येष्ठता-नि-गुणवत्ता या आधारे योग्य व्यक्तीस पदोन्नती देऊन करण्यात येईल;

(दोन) वैद्यकीय अधिकारी, गट-अ, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ या पदावर काम करीत असलेल्या आणि या नियमाच्या उप-नियम (ब) च्या खंड (दोन) मध्ये नामनिर्देशनाने नियुक्ती होण्यासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या किंवा ज्याने कोणत्याही चिकित्सासंबंधातील विषयातील पदव्युत्तर पदविका धारण केली आहे, अथवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ च्या पहिल्या अथवा दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता धारण केली आहे किंवा भारतीय वैद्यक परिषदेने त्यास समतुल्य म्हणून मान्यता दिलेली इतर कोणतीही शैक्षणिक अर्हता धारण केली आहे आणि ग्रामीण किंवा उपजिल्हा रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून पाच वर्षे इतक्या सेवेच्या अनुभवासह, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मध्ये किमान १० वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली आहे अशा व्यक्तींमधून ज्येष्ठता-नि-गुणवत्ता या आधारे योग्य व्यक्तीस पदोन्नती देऊन करण्यात येईल.

उपनियम (अ) च्या उप-खंड (एक) आणि (दोन) अन्वये उमेदवारांमधून द्यावयाच्या पदोन्नतीचे प्रमाण ७५ : २५ असे असेल:

परंतु, या नियमाच्या उपनियम (अ) च्या खंड (दोन) मध्ये नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव असणाऱ्या अशा योग्य उमेदवारांना पदोन्नती देण्यात येईल आणि त्यांची पदस्थापना जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक या पदावर केली जाईल.

**किंवा**

(ब) जे उमेदवार

(एक) ३८ वर्षांपेक्षा अधिक वयाचे नसतील:

परंतु, अगोरदच शासन सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा १० वर्षांपर्यंत शिथील करण्यात येईल.

(दोन) सांविधिक विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी धारण करीत असतील किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ च्या पहिल्या अथवा दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही इतर तत्सम अर्हता धारण करीत असतील.

(तीन) विद्यापीठाची कोणत्याही चिकित्सासंबंधातील विषयातील पदव्युत्तर पदवी धारण करीत असतील, अथवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ मधील पहिल्या अथवा दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली तत्सम अर्हता धारण करीत असतील किंवा भारतीय वैद्यक परिषदेने समतुल्य म्हणून मान्यता दिलेली इतर कोणतीही शैक्षणिक अर्हता धारण करीत असतील;

आणि

(चार) या नियमाच्या उप नियम (ब) च्या खंड (दोन) व (तीन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर कोणत्याही रुग्णालयातील कामाचा ५ वर्षांपेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीचा अनुभव, ज्यापैकी ३ वर्षांपेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीचा, किमान तीस खाटांची क्षमता असलेल्या कोणत्याही रुग्णालयातील अनुभव धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून आयोगामार्फत निवड करण्याच्या आधारे नामनिर्देशनाने करण्यात येईल.

४. " **जिल्हा आरोग्य अधिकारी** " गट-अ संवर्गातील पदावरील नियुक्ती एकतर—

(अ) (एक) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा संवर्गातील वैद्यकीय अधिकारी गट-अ या पदावर काम करीत असलेल्या आणि या नियमाच्या उप नियम (ब) च्या खंड (तीन) मध्ये नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व या पदावर किमान तीन वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तीमधून ज्येष्ठता-नि-गुणवत्ता याच्या आधारे पदोन्नतीने करण्यात येईल;

(दोन) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवेतील वैद्यकीय अधिकारी, गट-अ संवर्गात काम करीत असलेल्या व या नियमाच्या उप-नियम (ब) च्या खंड (दोन) मध्ये नामनिर्देशनाने नियुक्ती होण्यासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या किंवा प्रिव्हेंटिव अ‍ॅन्ड सोशल मेडिसीन मधील पदव्युत्तर पदविका धारण करणाऱ्या अथवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ च्या पहिल्या अथवा दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या अथवा भारतीय वैद्यक परिषदेने त्यास समतुल्य म्हणून मान्यता दिलेली इतर कोणतीही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व ज्यांनी ग्रामीण भागातील ५ वर्षे कामाच्या अनुभवासह, किमान १० वर्षांची नियमित सेवा पूर्ण केली असेल अशा व्यक्तींमधून ज्येष्ठता-नि-गुणवत्ता याच्या आधारे पदोन्नतीने करण्यात येईल;

उप-नियम (अ) च्या खंड (एक) व (दोन) मध्ये नमूद केलेल्या पदांवर उमदेवारांमधून पदोन्नतीने करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण ७५ : २५ असेल:

परंतु, या नियमाच्या उप-नियम (अ) च्या खंड (दोन) मध्ये नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता व अनुभव असलेल्या योग्य उमेदवारांना पदोन्नती देण्यात येईल व अशा व्यक्तींची पदोन्नतीनंतरची पदस्थापना जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गामधील निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यसंपर्क) अथवा जिल्हा क्षयरोग अधिकारी या पदावर केली जाईल.

**किंवा**

(ब) जे उमेदवार,-

(एक) ३८ वर्षे वयापेक्षा जास्त वयाचे नसतील:

परंतु, अगोदरच शासन सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा १० वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल.

(दोन) सांविधिक विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी धारण करीत असतील किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ च्या पहिल्या अथवा दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली अन्य कोणतीही तत्सम अर्हता धारण करीत असतील.

(तीन) सांविधिक विद्यापीठाची प्रिव्हेंटिव्ह अ‍ॅण्ड सोशल मेडिसीन मधील पदव्युत्तर पदवी धारण करीत असतील किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ मधील पहिल्या अथवा दुसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत असतील अथवा भारतीय वैद्यकीय परिषदेने त्यास समतुल्य म्हणून मान्यता दिलेली इतर कोणतीही शैक्षणिक अर्हता धारण करीत असतील.

(चार) या उप-नियमाच्या खंड (दोन) व खंड (तीन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर पाच वर्षांपेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीचा ग्रामीण सेवेचा अनुभव, ज्यापैकी तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतका आरोग्य प्रशासनात काम करण्याचा आणि राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम राबविण्याचा अनुभव धारण करीत असतील—

अशा उमेदवारांमधून, आयोगामार्फत निवड करण्याच्या आधारे नामनिर्देशनाने करण्यात येईल.

५. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाची नियुक्ती ही, ५० : ५० या प्रमाणात करण्यात येईल.

६. नामनिर्देशनाने पदावर नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षांच्या कालावधीकरिता परिवीक्षाधीन असेल. परिवीक्षा कालावधी कमाल १ वर्षापर्यंत वाढवता येईल. पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने परिवीक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण करणे आवश्यक राहील. जर त्या व्यक्तीने परिवीक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केला नाही अथवा ती व्यक्ती सदर पदाकरिता योग्य नसल्याचे आढळून आले तर, ती, तिची सेवा समाप्त करण्यासाठी पात्र राहील.

७. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, मराठी व हिंदी भाषा परीक्षांविषयी केलेल्या नियमानुसार, जर या अगोदरच या परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला या परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट दिलेली नसेल तर, तिने या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

८. या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीला आवश्यकतेनुसार कोणत्याही भारतीय संरक्षण सेवेमध्ये किंवा भारताच्या संरक्षणाशी निगडीत असलेल्या पदावर भारतात अथवा भारताबाहेर चार वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी (प्रशिक्षणासाठी व्यतित केलेला कालावधी जमेस धरुन) वेळोवेळी भारत सरकारने विहित केलेल्या अटींनुसार सेवा बजावावी लागेल:

परंतु ज्या व्यक्तींची त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून १० वर्षे सेवा पूर्ण झालेली आहे अथवा त्याच्या वयाची ४५ वर्षे पूर्ण झाली आहेत, यापैकी जे आधी घडेल त्यानंतर, अशी सेवा बजावावी लागणार नाही.

९. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्तीसाठी निवड झालेल्या व्यक्तीस, पदग्रहण करण्यापूर्वी तिने किंवा त्याने आपले नाव भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ अन्वये नोंदवले नसेल अथवा, भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ अन्वये ठेवण्यात येणाऱ्या नोंदवहीत अंतर्भूत केले नसेल तर, त्याला किंवा तिला महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ अनुसार नाव नोंदणे आवश्यक राहील.

१०. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले, संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

११. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

१२. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस कोणताही खाजगी व्यवसाय करण्यास मनाई करण्यात येईल. परंतु नियमांनुसार त्याच्या बदल्यात व्यवसाय रोध भत्ता अदा करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ता. मा. कोळेकर,**
शासनाचे सह सचिव.

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

Gokuldas Tejpal Hospital, Campus Building, 10th Floor, Mantralaya,

Mumbai 400 001 dated the 18th January 2021

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No.RTR-2012/CR-167/SER-II :- In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of Constitution of India and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules, regulating recruitment to the post of the Civil Surgeon cadre, Group-A, or District Health Officer cadre, Group-A, in the Maharashtra Health Services, Group-A under the Commissionerate of Health Services under the Public Health Department of the Government of Maharashtra, namely:—

1. These rules may be called the Civil Surgeon cadre, Group-A and District Health Officer cadre, Group-A in the Maharashtra Health Services, Group-A (Recruitment) Rules, 2021.

2. In these rules, unless the context requires otherwise.

(a) "Civil Surgeon cadre" means Assistant Director (Medical) or Assistant Director, Additional Civil Surgeon (Clinical), Medical Officer (Physician), Medical Officer (Surgeon), Medical Superintendent or Superintendent, Sub District Hospital or Rural Hospital or Women Hospital or Other Hospitals or Orthopedic Hospital or Regional Referral Hospital or General Hospital, Medical Officer (Hospital Training Centre), Officer on Special Duty, Regional Referral Hospital in the Civil Surgeon cadre;

(b) "District Health Officer cadre" means Assistant Director (Family Welfare or Maternal Health or Child Health or Malaria or Leprosy or Leprosy Training Centre or Tuberculosis or Adult Re-Productive and Sexual Health or Filaria), Principal or Epidemiologist or Medical Lecturer-*cum*-Demographer, Health and Family Welfare Training Centre, Senior Lecturer or Professor, Public Health Institute, Senior Scientific Officer (Nutrition), Additional or Assistant District Health Officer, District Re-Productive and Child Health Officer, Resident Medical Officer (Out-Rich), District Tuberculosis Officer, in the District Health Officer cadre;

(c) "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

(d) "Degree" means a degree of a Statutory University;

(e) "Commissionerate" means Commissionerate of Health Services, Mumbai;

(f) "Government" means the Government of Maharashtra;

(g) "Medical Council of India" means the Medical Council of India Constituted under the Indian Medical Council Act, 1956;

(h) "Statutory University" means the University established by law for the time being in force.

3. Appointment to the post in the "Civil Surgeon Cadre", Group-A shall be made either; -

(a) by promotion -

(*i*) on the basis of seniority-*cum*-merit from amongst the suitable persons holding the post of Medical Officer, Maharashtra Medical and Health Services Group-A and possessing the qualification prescribed for appointment by nomination in clause (*iii*) of sub-rule (*b*) of this rule having not less than three years regular service in that post;

(*ii*) on the basis of seniority-*cum*-merit from amongst the suitable persons holding the post of Medical Officer, Maharashtra Medical and Health Services, Group-A and possessing the qualification prescribed for appointment by nomination in clause (*ii*) of sub-rule (*b*) of this rule or who possess the post graduate diploma in any clinical subject or the qualification specified in First or Second Schedule to the Indian Medical Council Act, 1956 or any other qualification recognized as equivalent thereto by Medical Council of India having minimum 10 years of regular service in the Maharashtra Medical and Health services, Group-A and out of which, having five years experience of working as Medical Officer in Rural Hospital or Sub District Hospital.

Ratio of promotion to be filed in amongst the candidates in sub-clauses *(i)* and *(ii)* of sub-rule *(a)* shall be 75:25 :

Provided that, the suitable candidates having qualifications and experience in clause (*ii*) of sub-rule (*a*) of this rule shall be promoted and posted only on the post of Medical Superintendents, in charge of Rural Hospitals in the Civil Surgeon cadre.

**or**

(*b*) by nomination on the basis of selection through Commission from amongst the candidates who -

(*i*) are not more than thirty-eight years of age:

Provided that, the upper age limit may be relaxed upto ten years in case of candidates who are already in the service of Government;

(*ii*) possess M.B.B.S. degree of a statutory University or any other qualification specified in the First Schedule or Second Schedule to the Indian Medical Council Act, 1956;

(*iii*) possess a post graduate degree of a statutory university in any clinical subject or the qualification specified in the First or Second Schedule to the Indian Medical Council Act, 1956, or any other qualification recognized as equivalent thereto by the Medical Council of India.

**and**

(*iv*) possess experience of working in a hospital, of not less than five years out of which minimum three years experience of working in any hospital having minimum capacity of 30 beds gained after acquiring qualification mentioned in clauses (*ii*) and (*iii*) of sub-rule (*b*) of this rule.

4. Appointment to the post in the "District Health Officer Cadre", Group-A shall be made either,

(*a*) by promotion from amongst the candidates who,-

(*i*) on the basis of seniority-*cum*-merit from amongst the persons holding the post of Medical Officer, Maharashtra Medical and Health Services, Group-A and possessing the qualification prescribed for appointment by nomination in clause (*iii*) of sub-rule (*b*) of this rule having not less than three years regular service in that post;

(*ii*) on the basis of seniority-*cum*-merit from amongst the persons holding the post of Medical Officer, Maharashtra Medical and Health Services, Group-A and possessing the qualification prescribed for appointment by nomination in sub-clause(*ii*) of sub-rule (*b*) of this rule or possess the post graduate diploma in preventive and social medicine or the qualification specified in First or Second Schedule to the Indian Medical Council Act, 1956 or any other qualification recognized as equivalent thereto by the medical council of India, having minimum ten years of regular service in the Maharashtra Medical and Health Services, Group-A and out of which having five years experience of working as Medical Officer in Government Institution in Rural area.

Ratio of promotion to be filed in amongst the candidates in sub-clauses (*i*) and (*ii*) of sub-rule (*a*) shall be 75:25 :

Provided that, the suitable candidates having qualifications and experience in clause (*ii*) of sub-rule (*a*) of this rule shall be promoted and posted only on the post of Resident Medical Officer (Out-reach) and District Tuberculosis officer in the District Health Officer Cadre.

**or**

(b) by nomination on the basis of selection through Commission from amongst the candidates who,-

(*i*) are not more than thirty-eight years of age:

Provided that, the upper age limit may be relaxed up to ten years in case of candidates who are already in the service of Government;

(*ii*) possess M.B.B.S. degree of a statutory University or any other qualification specified in the First Schedule or Second Schedule to the Indian Medical Council Act 1956;

(*iii*) possess a post graduate degree of a statutory University in Preventive and Social Medicine or the qualification specified in the First or Second Schedule to the Indian Medical Council Act, 1956, or any other qualification recognized as equivalent thereto by the Medical Council of India.

(*iv*) possess experience of not less than five years rural service out of which not less than three years experience of working in Health Administration and implementation of National Health Programmers after acquiring qualification mentioned in clause (*ii*) and (*iii*) of this sub-rule.

5. Appointment to the posts mentioned in rule 3 and 4 by promotion and by nomination, shall be made in the ratio of 50:50.

6. A person appointed to the post by nomination shall be on probation for a period of two years. Probation period may be extended maximum up to one year. A person appointed to the post shall be required to complete the probation period satisfactorily. If he or she does not complete the probation period satisfactorily or is not found suitable for the post, then he or she shall be liable to be terminated from service.

7. A person appointed to the post shall be required to pass examinations in Hindi and Marathi languages according to the rules made in that behalf, unless he or she has already passed, or has been exempted from passing, these examinations.

8. A person appointed to the post shall, if so required, be liable to serve in any Defense Service of India or a post connected with the defense of India, anywhere in or outside India, for a period of not less than four years (inclusive of the period spent on training, if any) on such conditions as may be determined from time to time by the Government of India:

Provided that, such person shall not be required to serve as aforesaid after the

expiry of ten years from the date of his appointment or after he has attained the age of forty-five years, whichever is earlier.

9. A person selected for appointment to the post mentioned in rules 3 and 4 shall be required to get himself registered under the Maharashtra Medical Council Act, 1965, before joining the post unless he or she has already so registered or his or her name is borne on the Indian Medical Register maintained under the Indian Medical Council Act, 1956.

10. A person appointed to the post mentioned in rules 3 and 4 should possess a certificate in Computer Operations prescribed by the Directorate of Information Technology, Government of Maharashtra from time to time.

11. A person appointed to the post mentioned in rules 3 and 4 shall be liable for transfer anywhere in the State of Maharashtra.

12. A person appointed to the post mentioned in rules 3 and 4 shall be debarred from doing any private practice, but will be paid compensatory allowance in lieu thereof according to the rules.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

TATOBA M. KOLEKAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.